एस.एस.छल्लाणी प्र.वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय क्रं. १ यांचे न्यायालय चांदवड.

**आर. सी. सी. क्रं. ०४/२०२४**

**सरकार वि. शंकर + १.**

**निशाणी– ११.**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची जबानी.**

**मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,**

**माझे नाव** – उषा किरण गांगुर्डे,

**वय**– २३ वर्ष– धंदा– शेती.

**राहणार** – कोकणखेड, ता. चांदवड, जि. नाशिक.

.....................................................................................................

**सरकारपक्षाच्या वतीने साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एन. पी. मोरे यांच्या मार्फत शपथेवर सुरु.**

**०१.** दिनांक ११/१०/२०२३ रोजी सकाळी ०८.०० वाजता परशराम गांगुर्डे घराच्या पाठीमागे आले. त्यावेळी सासरे अंबादास गांगुर्डे व सासु संगिता गांगुर्डे यांचे आरोपी परशराम याच्यासोबत पैशाच्या देवाणा घेवाण बाबत सासरे त्याला समजावून सांगत होते. त्यावेळी आरोपी परशराम जास्त ओरडत होते. त्यावेळी मी घरातून बाहेर आले. त्यावेळी त्या ठिकाणी शंकर गांगुर्डे व मिराबाई गांगुर्डे आले. मी त्यावेळी शंकर गांगुर्डे याला व्यवहाराचे मोठे समजून घेतिल असे सांगितले. त्यावेळी आरोपी शंकर मला ढकलू लागले, मिराबाई हिने मला हात धरुन पोटावर उजव्या बाजूने पाडले. माझ्या सासु–सास–यांनी मला त्यावेळी धरले होते. त्यावेळी लहानू शिंदे व नाना मोरे आले होते. त्यांनी मिटवा मिटव केली. मी त्यावेळी गरोदर होती व उजव्या बाजूने पोटावर पडल्याने मला पोट दुखू लागले. त्यानंतर दवाखान्यात गेले होती. डॉक्टरांनी मालेगाव येथे पाठविले होते. मला पाच–सहा दिवसांनी बरे वाटले व त्यानंतर प्रमाणपत्र घेवून पोलिस स्टेशनला गेले होते. आता मला फिर्याद व छापील प्रथम खबरी अहवाल दाखवला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व

बरोबर आहे. त्यांना अनुक्रमे **नि. क्रं. १२ व १३** देण्यात आला. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकते. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपीतर्फे श्री. व्ही. एस. व्यवहारे वकिल यांच्यामार्फत – नि. क्रं. १४ वरील अर्जावरुन पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात आला.**

समक्ष

(एस.एस.छल्लाणी)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
न्या.क्र.१, चांदवड

(एस.एस.छल्लाणी)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
न्या.क्र.१, चांदवड

**दिनांक – ०६/११/२०२५**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्री. व्ही. एस. व्यवहारे वकिल यांच्यामार्फत – शपथेवर पुढे सुरु.</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी माझे नातेवाईक आहेत. आरोपी क्र. २ माझी चुलत सासु व आरोपी क्र. १ माझा दिर आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व माझे शेत बांधालाबांध लागून आहे. आरोपी व माझे घर जवळजवळ आहे. आमचे घराजवळच थोडया अंतरावर पोलिस पाटील बबन खैरनार याचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचा नेहमीचा येण्याजाणेचा रस्ता माझ्या घराच्या मागुन आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमचे लग्नाचे वेळी आरोपीने रुपये १५०००/– उसनवार रक्कम दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी सदरची उसनवार रक्कम माझे सासु, सास–यांकडे परत मागितली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्याचा मला व माझ्या पतीला राग आला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदरची रक्कम आरोपीला देवू लागु नये म्हणून बनाव रचला व आरोपी विरुध्द खोटी फिर्याद दिली आहे.

०३. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात संपुर्ण खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी शंकरने मला ढकलले व मिराबाई हिने मला हात धरुन पोटावर उजव्या बाजूने पाडले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी शेती काम करीत असताना पाय घसरुन खाली पडले व मला मार लागला होता. हे म्हणणे खरे नाही की, कोणतीही घटना घडली नसताना आरोपी विरुध्द खोटी फिर्याद दिली आहे व आज खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.

फेरतपास काही नाही.

वा. दा. क. केले.

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2025.11.17 18:16:19 +0530

**(एस.एस.छल्लाणी)**
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
न्या.क्र.१, चांदवड

समक्ष

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2025.11.17 18:16:24 +0530

**(एस.एस.छल्लाणी)**
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
न्या.क्र.१, चांदवड

**दिनांक – १७/११/२०२५**